admn22-23


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेलः edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१६२२/१९२६ दि. ३० ऑगस्ट,२०२२

## परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया सन २०२२-२३ करिता सर्व पदवी महाविद्यालयांनी संकेतस्थळावर नोंदणी करणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याने सदर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येते.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येईल. सदरची प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील शासकीय / अनुदानित / खाजगी विना अनुदानित महाविद्यालयांनी ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून सदरची सुविधा सुरु करण्यात आलेली असून यासाठी खालील लिंकद्वारे महाविद्यालयांनी ऑनलाईन नोंदणी करावी. सदरची लिंक दि. १० सप्टेंबर,२००२ पर्यंत कार्यरत असेल.

Link: https://regugcollege.agriadmissions.in/AgriUGCollegeReg/InstituteLoginRegistration.aspx

ऑनलाईन नोंदणीमध्ये (१) महाविद्यालयाचे मान्यतेचे पत्र, (२) महाविद्यालयास भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे मानांकन प्राप्त असल्यास त्याबाबतचे पत्र आणि (३) संबंधित कृषी विद्यापीठाचे प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्याविषयीचे खाजगी विना अनुदानित महाविद्यालयांना द्यावयाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' अशी कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत.

सर्व शासकीय / अनुदानित / खाजगी विना अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयांची नोंदणी विहित वेळेत पूर्ण करावी.

**(हरिहर कौसडीकर)**
**संचालक (शिक्षण)**

प्रतः-

१. **कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी),** महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२. **मे. विबास टेक्नोलॉजी , पुणे** यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

**प्रत माहितीसाठी सादरः-**

मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.